# 'एम्को' फाउंडेशन पुरस्काराने सन्मानित

## सी.एस.आर.दिन : सामाजिक कार्यात योगदान

**जळगाव :** सामाजिक कार्यात उत्कृष्ट योगदान म्हणून जागतिक सी.एस.आर.दिन या संस्थेकडून एम्को फाउंडेशनला सर्वश्रेष्ठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मुंबई येथील ताज हॉटेलमध्ये नुकताच हा वितरण सोहळा पार पडला. फाउंडेशनतर्फे एम्को कंपनीचे मुख्य व्यवस्थापक उमेश दोशी यांनी पुरस्कार स्वीकारला.

सन २००७मध्ये एम्को लिमिटेडद्वारे एम्को फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. फाउंडेशन ग्रामीण तसेच शहरी भागात शैक्षणिक विकास, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य सेवा या तीन महत्त्वपूर्ण क्षेत्रात कार्य करीत आहेत. यात आतापर्यंत ७५ हजारांपेक्षा जास्त



पुरस्कार स्वीकारताना उमेश दोशी

व्यक्तींच्या जीवनात बदल घडवण्यची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

या उपक्रमाची दखल घेत या पुरस्काराने फाउंडेशनला सन्मानित करण्यात आले.